## महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची पाचवी बैठक मंगळवार दिनांक २८ जून २०११
## कार्यवृत्तांत

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची ५ वी बैठक मंगळवार दिनांक २८/६/२०११ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, नामदार श्री. पृथ्वीराजजी चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. बैठकीतील इतर उपस्थितांची नांवे सोबतच्या यादीत दिलेली आहेत. सभेच्या सुरुवातीस प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर तथा सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची पार्श्वभूमि व सभेत ठेवण्यांत आलेल्या विषयांबाबत प्रास्तविक केले. त्यानंतर मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने विषयसूचीनुसार सभेत माहिती दिली. बैठकीत देण्यात आलेली माहिती, झालेली चर्चा व मंडळाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

**विषय क्रमांक १(अ) : दिनांक २०-२-२००९ रोजी मुंबई येथे झालेल्या ४थ्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा सदस्य सचिव यांनी बैठकीत असे सांगितले की, मागील बैठकीचे कार्यवृत्तांत सर्व मा. सदस्यांना दिनांक ४ एप्रिल २०१० च्या पत्रान्वये पाठविण्यात आले होते. त्यावर कोणत्याही सदस्यांनी आपले अभिप्राय कळविले नाही. या कार्यवृत्तांतास मंजूरी देण्यास त्यांनी मंडळास विनंती केली. त्याप्रमाणे दिनांक २० फेब्रुवारी २००९ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्रमांक १(ब) : त्या बैठकीतील निर्णयावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा**

सदर बैठकीतील मुद्या क्रमांक ३,५,१५ व १६ बाबत कार्यवाही पूर्ण झाल्याबाबत मंडळाने नोंद घेतली. इतर मुद्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | मुद्दा | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय | सभेत झालेले निर्णय |
|---|---|---|---|
| १ | जायकवाडी अभयारण्य | या संदर्भात वन विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यात दिनांक ३ जून, २०१० रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. पाटबंधारे विभागाने विद्यापीठास रुपये १० लक्ष निधी उपलब्ध करुन दिला आहे. विद्यापीठाकडून तेथे आढळणा-या प्राणी व वनस्पतीची यादि तयार करण्यांत आली आहे. पुढील अभ्यास चालू आहे. | सदर अभ्यास लवकर पूर्ण करुन या अभयारण्याचे क्षेत्र निश्चितीबाबत कार्यवाही करण्यात यावी. |
| २ | प्रस्तावित इसापूर पक्षी अभयारण्य | ३३.२५ चौ.कि.मी. क्षेत्रावर ईसापूर अभयारण्य स्थापन करण्याचा सुधारीत प्रस्तावाचा मसुदा मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांचेकडून प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयास दि. १०.३.२०१० ला प्राप्त झाला. त्या प्रस्तावाचे सादरीकरण उप वनसंरक्षक (वन्यजीव) औरंगाबाद यांचेद्वारे मुख्य अभियंता आणि प्रमुख प्रशासक, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांच्यासमोर दि. १०.३.२०१० ला करण्यात आले. पाटबंधारे विभागाच्या प्रतिनिधींनी प्रस्तावास सहमती दिली. तथापि, पाटबंधारे विभागाकडून सहमती अद्याप प्रतिक्षित आहे. मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांनी त्यांच्या दिनांक १६-५-२०११ च्या पत्राने पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांना लेखी सहमती देण्याबाबत स्मरण करुन दिले आहे. | अभयारण्य अधिसूचीत करण्याचा प्रस्ताव जलसंपदा विवभागामार्फत शासनास सादर करण्यांत यावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | कोपेला कोलामार्का संवर्धन / सामुदायिक राखीव क्षेत्र स्थापन करणे. | वाईल्ड लाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया यांनी रानम्हशींच्या संवर्धनाबाबतचा अभ्यास अहवाल तयार केला आहे. रानम्हशींच्या अधिवासास वन वणवे, गुरे चराई, मासेमारी, वनसंसाधनांवरील लोकांचा दबाव आणि शिकार या स्वरुपातील धोके असल्याचे अभ्यास अहवालात नमूद करण्यात आले आहे. हे क्षेत्र नक्षलवादी कारवायांनी ग्रस्त आहे. तथापि, वर नमूद धोक्यांचे नियंत्रण करण्यासाठी वन विभाग, जाळ रेषा राखणे, गस्त, संरक्षण चमूसाठी वाहने उपलब्ध करणे , आदि उपाययोजना करीत आहे. | सदर क्षेत्र नक्षलग्रस्त असल्याने व वाईल्ड लाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया यांचा अहवाल व क्षेत्रातील नक्षलग्रस्त कारवायांचा विचार करता कोपेला कोलामार्का संवर्धन / सामुदायीक राखीव क्षेत्र स्थापन करण्याबाबत तपासून निर्णय घ्यावा. त्यानंतर करुन सदर क्षेत्रातील रान म्हशींच्या संवर्धनाच्या दृष्ट्रीने आवश्यक कामे घेण्यात यावीत. |
| ६. | संरक्षित क्षेत्रापासून १० कि.मी. पर्यंतच्या क्षेत्रास पर्यावरण संवेदनशील क्षेत्र जाहीर करणे. | दिनांक ३१-०३-२००९ च्या पत्रान्वये संरक्षीत क्षेत्रांची यादी राज्य वन्यजीव मंडळाच्या सर्व सदस्यांना देण्यात आली आहे. या क्षेत्रास इको सेन्सीटिव्ह झोन जाहिर करण्याच्या संदर्भात संबंधीत जिल्हाधिकारी यांच्याकडून जनतेशी सल्लामसलत करून अहवाल मागविण्यात आले आहेत. आता केंद्र शासनाने पत्र दिनांक ९ फेब्रुवारी २०११ नुसार सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. | केंद्र शासनाने दिनांक ९ फेब्रुवारी २०११ रोजी जारी केलेल्या नविन मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्यात यावी. |
| ७. | वन्यजीवांच्या अवयवांपासून मिळणारी उत्पादने | या संदर्भात मुख्य वन्यजीव रक्षकांनी ७ मार्च २००७ च्या पत्राने केन्द्र शासनाला प्रवाळ शंख, कस्तूरी, भारशिंगे इत्यादिंची उपलब्धता पध्दत आणि आयुर्वेदिक औषधांमधील त्यांचा वापर याबाबतचा केंद्र शासनाचा निर्णय कळविण्यांत यावा अशी विनंती केली. त्यावर पाठपुरावा करण्यात येत आहे. | केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. |
| ८ | ग्राम विकास परिसर विकासाचे आराखडे तयार करणे. | मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक या पदावर अधिकारी रुजू झाले होते. तथापि, चालू वर्षी झालेल्या पदोन्नती व बदल्यामुळे पून्हा सदर पद अतिरिक्त कार्यभारात आहे. या कारणास्तव ग्राम परिसर विकासाचे नमूना आराखडे तयार होवू शकले नाहीत. | ग्राम परिसर विकासाचे आराखडे पूर्ण करुन त्यात प्रस्तावित बाबींबाबत कार्यवाही करण्यात यावी. |
| ९ | महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन मंडळ स्थापन करणे | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी जंगल लॉजेस ॲन्ड रिसॉर्ट लिमीटेड, बंगलोर या सल्लागारांचा अहवाल शासनास दिनांक १९ एप्रिल, २०१० च्या पत्राने मान्यतेसाठी पाठविला असून तो शासनाच्या विचाराधीन होता. दरम्यान केंद्रशासनाने दिनांक २/६/२०११ रोजी निसर्ग पर्यटनासाठी नवीन प्रारूप मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. | अ) निसर्ग पर्यटनाअंतर्गत सर्व संरक्षित क्षेत्राची वर्गवारी त्या क्षेत्रास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येच्या आधारावर करण्यात यावी व त्यानुसार निसर्ग पर्यटन आराखडे तयार करण्यात यावेत. वन क्षेत्रातील वन विश्राम गृहे व पर्यटन संकूलामध्ये क्षेत्रीय वन कर्मचाऱ्यांचा वापर त्याच्या व्यवस्थापने करता करण्यात येऊ नये व अशा सर्व कर्मचाऱ्यांना संरक्षणाच्या कामाकरिता वापरण्यात यावे. त्याच प्रमाणे निसर्ग पर्यटन हे वन विभागाचे मुख्य काम नसून वन व वन्यजीव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | संरक्षणाच्या कामाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असल्यामुळे असे पर्यटन संकूल व वन विभागाची निवडक विश्रांमगृहे स्थानिक बचत गट, स्थानिक उद्योजक व वन कर्मचाऱ्यांचे सहकारी संस्था यांच्या माध्यमातून भोजन व्यवस्था इत्यादीची कामे करुन घेण्याबाबत तपासावे तसेच वन क्षेत्रा बाहेरील वन विश्राम गृह खाजगी उद्योजकाकडून व्यवस्थापना करीता देण्याचाही प्रस्ताव तपासवा.<br>ब) व्याघ्र प्रकल्पक्षेत्रात केंद्र शासनानी प्रस्तावित केलेल्या प्रारुप निसर्ग पर्यटन मार्गदर्शक सूचना सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात सरसकट लागू न करता व्याघ्र प्रकल्प क्षेत्रांचे वर्गीकरण करुन त्यानुसार लागू करण्यात यावीत असे केंद्र शासनास सूचवावे |
| १० | महाराष्ट्र वन्यजीव (संरक्षण) नियम, १९७५ मध्ये सुधारणा | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी दिनांक ११-८-२००८ च्या पत्राने नियमाच्या मसुदयाची प्रत मंडळाच्या सर्व सदस्यांना पाठविली होती. कोणत्याही सदस्यांचे त्यावर अभिप्राय प्राप्त झाले नाहीत. त्यानंतर पुन्हा सदस्यांना त्याची सीडी पाठविण्यात आली आहे. त्यावर अजून अभिप्राय प्राप्त झाले नाहीत. दरम्यान प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी मसूदा तपासण्यासाठी एक तांत्रिक समिती दिनांक २०-१-२०१० ला तयार केली आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) समितीचे अध्यक्ष आहेत. समितीचे कार्य सुरु आहे. | नियमांचा मसूदा तात्काळ सादर करण्यात यावा. |
| ११ | सागरी कासवांचे संरक्षण करणे | दिनांक २०-८-२००९ रोजी रुपये ४.२४ लक्षचा प्रस्ताव केन्द्रीय वन व पर्यावरण मंत्रालयास पाठविण्यांत आला होता. वर्ष २०१०-११ करीता तसाच प्रस्ताव केन्द्रीय वन व पर्यावरण मंत्रालयास पाठविण्यांत आला. ते प्रस्ताव मंजूर झाले नाहीत. वर्ष २०११-१२ करीता नव्याने प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. | २०११-१२ साठीचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठवून त्याबाबत पाठपुरावा करण्यात यावा. त्याचप्रमाणे राज्य शासनानेही या महत्वाच्या कामाकरीता वित्तीय तरतूद करावी व सह्याद्री निसर्ग मंडळाशी (श्री. विश्वास काटदरे) संमन्वय साधून सागरी कासवांचे संवर्धन व प्रचाराचे काम हाती घ्यावे. |
| १२ | गिधाडांचे सनियंत्रण. गिधाडांपासून | शासन निर्णय दि. २-७-२०१० अन्वये ७ रुपये प्रती नारळ याप्रमाणे प्रति हंगाम ४००/- प्रती नारळाचे झाड या दराने नुकसान भरपाई देण्याची तरतूद | सदर कार्यवाहीबाबत मंडळाने समाधान व्यक्त केले. मा.राज्यमंत्री (वने) यांनी शासन |